ePaper

# शिवसेना मुख्य नेतेपदी एकनाथ शिंदेंची निवड!



वर्ष - 6 । अंक - 307 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- भाजपाकडून दहशतीचे वातावरण
- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे 'ऑन फिल्ड'!
- उद्धव सेने पुढील आव्हाने
- कपिल सिब्बल यांचा न्यायालयात तिखट युक्तिवाद


www.mahaenews.com | बुधवार , दि. 22 फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# सोसायटीधारकांसाठी भाजपाचे 'रेड कार्पेट'!

## उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे 'मायक्रो कॅम्पेनिंग' : सोसायटीधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी दीर्घकालीन नियोजन करणार

। पिंपरी । महाईन्यूज ।विशेष प्रतिनिधी ।

**पिंपरी-चिंचवड शहरातील आगामी राजकारणाची दिशा ठरवणाऱ्या चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'मायक्रो कॅम्पेनिंग' सुरू केले. शहरातील सोसायटीधारकांसाठी भाजपाकडून 'रेड कार्पेट' तयार केले असून, आगामी काळात सोसायट्यांच्या समस्या कायमस्वरुपी सोडवण्यासाठी दीर्घकालीन नियोजन करण्याचे आश्वासन फडणवीस यांनी दिले आहे. त्यामुळे सोसायटीधाकरकांच्या मतांसाठी गेल्या काही दिवसांपासून प्रयत्न करणारे अपक्ष उमेदवार राहुल कलाटे आणि महाविकास आघाडीचे नाना काटे यांचा फटका बसण्याची शक्यता आहे.**



रावेत, किवळे, वाकड, पुनावळे आदी भागातील सोसायटीधारकांशी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट संवाद साधला. यावेळी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, भाजपाचे शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, आमदार श्रीकांत भारतीय, माजी मंत्री बाळा भेगडे, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप, प्रदेश प्रवक्ते एकनाथ पवार, सर्व स्थानिक पदाधिकारी व माजी नगरसेवक तसेच सर्व गृहनिर्माण सोसायट्यांचे पदाधिकारी, प्रतिनिधी व नागरिक उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृहनिर्माण सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांकडून त्यांना येणाऱ्या दैनंदिन अडीअडचणी समजून घेतल्या. त्यांच्याशी संवाद साधून प्रत्येक अडीचणी व प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्यासमोर नागरिकांना येणाऱ्या अडचणींचे गाऱ्हाणे मांडले. विकास आराखड्यानुसार रस्ते होत नसल्याने वाहतुकीची प्रचंड समस्या निर्माण झाल्याचे सांगितले. बिल्डरांचाही अनेक प्रकारे त्रास सोसायट्यांतील नागरिकांना सहन करावा लागतो. मजल्यावर मजले चढतात पण पाण्याचा प्रश्न काही सुटत नसल्याकडे त्यांनी फडणवीसांचे लक्ष वेधले. सोसायट्यांच्या प्रतिनिधींकडून सर्व समस्या ऐकून घेतल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याबाबत तोडगा काढण्यासाठी सोसायटी फेडरेशनसोबत मंत्रालयात बैठक घेण्याचे आश्वासन दिले. रस्ते, वाहतूक, पाणी, कचरा या सर्व समस्या सोडवण्यासाठी भाजप कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. शहरातील जनतेने पहिल्यांदाच भाजपच्या हातात महापालिकेची सत्ता दिल्यानंतर अवघ्या पाच वर्षांत विकासाला प्रचंड गती देण्यात आली आहे. सोसायटीधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी शासन आणि महापालिकेकडे सतत पाठपुरावा केला होता. अनेक प्रश्न त्यांनी सोडवले आहेत. काही राहिलेले प्रश्नही सोडवू, असे आश्वासन त्यांनी दिले. तसेच पोटनिवडणुकीत भाजप-शिवसेना मित्रपक्ष महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांना भरघोत मतांनी निवडून देण्याचे आवाहन त्यांनी गृहनिर्माण सोसोयट्यांतील नागरिकांना केले.

### महेश लांडगे यांची जोरदार बॅटिंग...

भोसरी विधानसभा मतदार संघामधील सोसायटीधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी आमदार महेश लांडगे यांची गेल्या काही वर्षांपासून मोठ्याप्रमाणात काम हाती घेतले आहे. त्यामुळे सोसायटीधारकांशी सुसंवाद आणि समस्या सोडवण्यासाठी मदत होते. त्याच धर्तीवर पिंपरी-चिंचवडमधील सोसायटीधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी लांडगे यांनी नागपूर येथील विधीमंडळ अधिवेशनात लक्षवेधी प्रश्न उपस्थित केला होता. त्यामुळे सोसायटीधारकांच्या समस्या सोडवण्याबाबत राज्य सरकारने पुढाकार घेतला आहे. आज झालेल्या सोसायटीधारकांच्या बैठकीत लांडगे यांनी पुढाकार घेत सोसायटीधारकांच्या समस्या सोडवण्याबाबत आम्ही कटीबद्ध असल्याचे सांगितले. काही प्रश्न सुटलेले नसतील तर ते सुद्धा सोडवण्याची धमक फक्त भाजपमध्येच आहे. त्यामुळे गृहनिर्माण सोसायट्यांच्या प्रलंबित प्रश्नांकडे आम्ही दुर्लक्ष करणार नसल्याचे वचन त्यांनी दिले.

> पिंपरी-चिंचवडमधील गृहनिर्माण सोसायट्यांना सर्व प्रकारच्या मुलभूत सुविधा पुरवण्यासाठी भाजप कटिबद्ध आहे. सोसायट्यांच्या प्रश्नांसंदर्भात सोसायटी फेडरेशनसोबत लवकरच मंत्रालयात बैठक घेऊन सविस्तर चर्चा करू. तसेच सर्व रस्ते विकास आराखड्यानुसार करून वाहतूक व्यवस्था सुरळित करण्याचे आणि पुरेसे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी दीर्घकालीन नियोजन करण्यात येणार आहे.
>
> - देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री.

# ... हा तर भाजपाचा केविलवाणा प्रयत्न!

## विरोधी पक्षनेते अजित पवार : खरा 'शॉक' जनताच देईल

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील बेरोजगारी, महागाई आणि भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून जनतेचे लक्ष वळवण्यासाठी नको ते मुद्दे भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांकडून उकरुन काढले जात आहेत. राज्यापुढील खरी आव्हाने कोणती आहेत, त्याला कारणीभूत कोण आहे, त्याचा माध्यमांनी आणि जनतेने विचार करावा, असे आवाहन राज्याचे विरोधी पक्ष नेते अजित पवार यांनी केले.**



रहाटणी येथे विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी पवार यांची भेट घेऊन त्यांच्या अडचणी मांडल्या. त्यानंतर पवार पत्रकारांशी बोलत होते.

'नाना काटे यांच्या विजयासाठी राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आणि शिवसेना कार्यकर्ते मनापासून प्रयत्न करत असून या निवडणुकीत काटे यांचा विजय निश्चित आहे. देशाला आणि राज्याला समस्यांच्या खाईत लोटणाऱ्या सत्ताधाऱ्यांना जनता वैतागली आहे. त्यामुळे सत्ताधाऱ्यांना जनता जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही', असा विश्वासही पवार यांनी व्यक्त केला.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी पवार यांना ४४० व्होल्टचा शॉक देणार असल्याचा पुनरुच्चार केला आहे, त्याबाबत पवार म्हणाले, 'त्यांनी काय बोलावे हा त्यांचा प्रश्न आहे. खरा शॉक देणारी जनता आहे. त्यामुळे अशा बाष्फळ बडबडीकडे मी फार लक्ष देत नाही.' माध्यमांनीही त्याकडे दुर्लक्ष करावे, असे पवार यांनी स्पष्ट केले. आमच्या उमेदवाराचा प्रचार आम्ही करत आहोत. त्याला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. विविध व्यावसायिक, नोकरदार आणि सामान्य जनता या सत्ताधाऱ्यांमुळे मेटाकुटीला आली आहे. जनता त्यांना धडा शिकवल्याखेरीज राहणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

> उध्दव ठाकरे यांना ब्लॅकमेल केले असल्याचा आरोप भगतसिंह कोश्यारी यांनी केला आहे, असे मोघम आरोप कोणी करू नयेत. त्यांना कोणी ब्लॅकमेल केले ते स्पष्टपणे सांगावे म्हणजे त्याचा संबंधितांना खुलासा करता येईल. नागपूर अधिवेशनात चार ते पाच मंत्र्यांची भ्रष्टाचाराची प्रकरणे उजेडात आली होती. काही काळ माध्यमांनी ती लावून धरली. मात्र नंतर भावनिक मुद्दे बाहेर काढून जनतेचे लक्ष त्यापासून विचलीत केले. त्यानंतर त्या मंत्र्यांना अलगद क्लीन चिट देण्यात आली. ही भारतीय जनता पक्षाची पध्दतच आहे.
>
> - अजित पवार, विरोधी पक्षनेते

# भाजपाकडून दहशतीचे वातावरण!

## नाना पटोले यांचा आरोप : पोलीस आयुक्तांना निवेदन

। पुणे । महाईन्यूज ।

**कसबा विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत भारतीय जनता पक्षाकडून कार्यकर्त्यांना दमदाटी करण्यात येत आहे. भाजपाकडून दहशत निर्माण केली जात आहे. या प्रकरणाची दखल घेऊन कारवाई करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पोलीस आयुक्त रितेश कुमार यांच्याकडे केली आहे.**



पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पटोले यांनी पोलीस आयुक्तांची मंगळवारी भेट घेतली. पटोले यांनी पोलीस आयुक्तांना निवेदन दिले. प्रदेश उपाध्यक्ष मोहन जोशी, राष्ट्रवादी काँग्रसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, भानुदास माली, अमित मेश्राम आदी या वेळी उपस्थित होती. पोटनिवडणुकीत पराभवाच्या भीतीने भारतीय जनता पक्षाकडून मतदारसंघात दहशतीचे वातावरण निर्माण केले जात आहे. भाजपचे खासदार, मंत्री, आमदार गाड्यांमधून फिरत आहेत. त्यांच्याबरोबर गुंड प्रवृत्तीचे काही जण आहेत. ते कार्यकर्त्यांना दमदाटी करत आहेत. मतदारांना प्रलोभने आणि आमिष दाखविण्याचे प्रकार सुरू झाले आहेत. दत्तवाडी, गंज पेठ, लोहियानगर परिसरात पैसै वाटप करण्यात आल्याच्या तक्रारी आहेत. पोलिसांच्या नावाने कार्यकर्त्यांना धमकावले जात आहे, असे पटोले यांनी निवेदनात म्हटले आहे. पोलिसांच्या नावे दूरध्वनी करणाऱ्यांचा शोध घ्यायला हवा. पोलीस यंत्रणेचा वापर भारतीय जनता पक्ष करत आहे. पोलीस आयुक्तांनी आचारसंहितेचा भंग होऊ नये, याची काळजी घेणे गरजेचे आहे, असे पटोले यांनी निवेदनात नमूद केले आहे.

# MPSC विद्यार्थ्यांच्या आंदोलनस्थळावरून शरद पवार-एकनाथ शिंदे यांच्यात चर्चा!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी यंदाच्या वर्षापासून सुरू करण्याचा निर्णय अद्याप बदललेला नाही. याविरोधात पुण्यात आंदोलन सुरू आहे. आज रात्री उशिरा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार यांनी भेट दिली आहे. यावेळी शरद पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी फोनवरुन चर्चा केली.

दरम्यान विद्यार्थ्यांना संबोधित करताना पवार म्हणाले की, माझ्याकडे हा प्रश्न आधीच आला आहे. मी मुख्यमंत्री शिंदे यांच्याशी संवाद साधला. मुख्यमंत्र्यांनी सांगितलं की, विद्यार्थी प्रतिनिधी, मी स्वत:, विद्यापीठाचे कुलगुरू, एमपीएससीचे पदाधिकारी आणि आपण बैठक घेऊ.

यावेळी शरद पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी आंदोलनस्थळावरून फोनवर संवाद साधला. त्यावर मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी दोन दिवसांत बैठक घेण्यास तयार असल्याचं म्हटलं.

दरम्यान बैठकीसाठी विद्यार्थ्यांकडून पाच प्रतिनिधींची नावे मुख्यमंत्र्यांसोबतच्या बैठकीसाठी देण्यात आली आहे. मात्र विद्यार्थ्यांनी आंदोलनावर नोटीस निघेपर्यंत ठाम असल्याचं म्हटलं आहे.



# 'पीएमपी'ची पाच रुपयांत पाच किलोमीटर प्रवास सेवा बंद

**पुणे** : पीएमपी प्रशासनाने पाच रुपयांमध्ये पाच किलोमीटर अंतरातील प्रवास योजनेअंतर्गत सुरू असलेले उर्वरित २८ मार्गही बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता ही सेवा कायमस्वरुपी बंद झाली आहे. मार्गांचे उत्पन्न, प्रवासी संख्या यांचा विचार करता प्रवाशांचा अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने पीएमपी प्रशासनाला हा निर्णय घ्यावा लागला आहे.पीएमपीने २५ ऑक्टोबर २०२० पासून पाच किलोमीटर अंतरासाठी पाच रुपये तिकीट आकारणी सुरू केली होती. त्यासाठी ५६ मार्ग निश्चित करण्यात आले होते. परंतु, काही मार्गांवर प्रवाशांचा प्रतिसाद नसल्यामुळे २८ मार्गांवर ही सेवा सुरू ठेवण्यात आली होती. मात्र, बस वाहतुकीसाठी येणारा खर्च आणि मिळणारे उत्पन्न यांचा विचार करता ५ किलोमीटर अंतरासाठी ५ रुपये तिकीट आकारणीमुळे पीएमपीचे आर्थिक नुकसान होत होते.



# पिंपरी महापालिका अतिरिक्त आयुक्तपदी सनदी अधिकाऱ्याची नियुक्ती करा

## महापालिका आयुक्तांचे राज्य शासनाला पत्र

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त एक या पदावर रेल्वे, वस्तू व सेवा कर विभाग आणि मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची नियुक्ती होऊ लागल्याने प्रशासनाने आता भारतीय प्रशासकीय सेवेतील सनदी (आयएएस) अधिकाऱ्याचीच अतिरिक्त आयुक्तपदी प्रतिनियुक्ती करण्याची मागणी शासनाकडे केली आहे. याबाबत आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी नगरविकास विभागाला पत्र पाठविले.**

नवीन आकृतीबंधानुसार पिंपरी-चिंचवड महापालिकेत तीन अतिरिक्त आयुक्तांची पदे निर्माण झाली आहेत. त्यातील दोन अतिरिक्त आयुक्त प्रतिनियुक्तीवरचे आणि महापालिका अधिकाऱ्यांकरिता पदोन्नतीसाठी एक याप्रमाणे तीन पदांची विभागणी करण्यात आली. यापूर्वी महसूल सेवेतील अप्पर जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती होत होती, परंतु मागील काही वर्षांत रेल्वे सेवेतील विकास ढाकणे, राज्य वस्तू व कर सेवेतील प्रदीप जांभळे, मुख्याधिकारी संवर्गातील स्मिता झगडे यांची अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती झाली. जांभळे यांची महाराष्ट्र प्रशासकीय लवादने (मॅट) नियुक्ती रद्द केली आहे. त्यांच्या जागी झगडे यांच्या नियुक्तीचे आदेश शासनाला दिले. पण, जांभळे यांनी या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. त्यामुळे अतिरिक्त आयुक्तपदाचा वाद काही केल्या संपुष्टात येत नाही. अतिरिक्त आयुक्त एक पदाच्या सुरू असलेल्या वादावरून महापालिकेची प्रतिमा मलीन होऊ लागली आहे.



या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी २८ डिसेंबर २०२२ रोजी महापालिका अतिरिक्त आयुक्त एक या पदावर प्रतिनियुक्तीने राज्य शासनाकडून वेळोवेळी नेमणूक करण्यात येईल, असा अधिकारी भारतीय प्रशासकीय सेवेतील असावा. तसेच अतिरिक्त आयुक्त दोन या पदावर शासनाचे सह सचिव, उपसचिव दर्जाचे, मुख्य अधिकारी (निवडश्रेणी) किंवा समकक्ष वेतनश्रेणीतील अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल. अतिरिक्त आयुक्त तीन या पदावर स्थानिक अधिकाऱ्यांमधून पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. याप्रमाणे नव्याने पद निर्मिती करून अतिरिक्त आयुक्त पदाचे नेमणूक अर्हता व वेतनश्रेणी दुरुस्तीसाठी नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे परवानगी मागितली. त्यावर शासनाने १४ फेब्रुवारी २०२३ रोजी महापालिकेला पत्र पाठवून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यास सांगितले. त्यानुसार महापालिका आवश्यक कागदपत्रांसह पुन्हा प्रस्ताव शासनाला पाठविणार आहे. त्यामुळे महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त एक या पदावर सनदी अधिकाऱ्याची नियुक्ती होवू शकते.

### महापालिकेत दोन मुख्य अभियंता

पिंपरी-चिंचवड महापालिका आस्थापनेवरील अभियांत्रिकी विभागाच्या आकृतीबंधामध्ये मुख्य अभियंत्याची दोन पदे निर्माण केली जाणार आहेत. शहर अभियंता या पदाला समकक्ष ही पदे असतील. या पदांची व संवर्गाची अर्हता, सेवाप्रवेश, नियम, वेतनश्रेणीस मान्यतेसाठी प्रस्ताव शासनाला पाठविला आहे. त्यावर शासनाने पदनिर्मिती व वेतनश्रेणी बदलामुळे महापालिकेवर पडणारा आर्थिक खर्चाचा तपशील, मुख्य अभियंता पदाची आवश्यकता, त्याबाबतचे निकष, कर्तव्य जबाबदाऱ्याचा तपशील याची माहिती मागविली आहे.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे 'ऑन फिल्ड'!

## » शिवसैनिकांचा संकल्प : चिंचवड पोटनिवडणुकीत विजयश्री खेचून आणणार!

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीतील भाजप-शिवसेना युतीच्या उमेदवार अश्विनी जगताप यांना निवडून आणण्यासाठी झोकून देवून काम करावे. प्रचाराला केवळ तीन दिवस राहिले आहेत. त्यामुळे सर्व कामे बाजूला ठेवून प्रत्येक मतदारांपर्यंत पोहचा, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या पदाधिका-यांना दिल्या.**

चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत भाजप-शिवसेना युतीच्या उमेदवार अश्विनी जगताप यांच्या प्रचाराचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सोमवारी रात्री पिंपरी-चिंचवड शहरात आले होते. त्यांनी शहरातील शिवसेनेच्या प्रमुख पदाधिका-यांच्या गाठीभेटी घेतल्या. मुख्यमंत्र्यांसोबत ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, शिवसेनेचे विधीमंडळातील प्रतोद भरत गोगावले, शिवसेना उपनेते, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील होते.

थेरगाव येथे पदाधिका-यांची बैठक घेतली. शिवसेना उपनेते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे, जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, उपजिल्हाप्रमुख राजेश वाबळे, मावळचे जिल्हा संघटक अंकुश देशमुख, पिंपरी-चिंचवडचे शहरप्रमुख निलेश तरस, जिल्हा संघटिका शैला पाचपुते, युवती संघटिका शर्वरी गावंडे, उपशहर प्रमुख बशीर सुतार, पिंपरी विधानसभा प्रमुख रुपेश कदम, चिंचवड विधानसभा प्रमुख सुरेश राक्षे, शहर संघटक सोमनाथ गुजर, रवींद्र ब्रह्मे, हाजी शेख, पिंपरी विधानसभा संघटक नरेश टेकाडे, संदीप पवार, निखील यवले, समन्वयक सुनील पाथरमल, चिंचवड विधानसभा संघटक रोहिदास दांगट, संतोष बारणे, सुदर्शन देसले, समन्वयक प्रदीप दळवी, उपविधानसभा संघटक राजेश अडसूळ, अंकुश कोळेकर, प्रशांत कडलग, महेश कलाल उपस्थित होते. चिंचवडमधून भाजप-शिवसेना महायुतीच्या उमेदवार अश्विनी जगताप या मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्या पाहिजेत. प्रचाराला केवळ तीन दिवस राहिले आहेत. त्यामुळे सर्व कामे बाजूला ठेवून झोकून देवून प्रचारात उतरावे. मतदारांपर्यंत पोहचा. रविवारी मतदानासाठी जास्तीत-जास्त मतदारांना बाहेर काढावे, अशा सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी शिवसैनिकांना दिल्या.



### शिवसैनिक रात्रीचा दिवस करुन प्रचार करतील

» खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, भाजप-शिवसेना युतीच्या उमेदवार अश्विनी जगताप यांच्या विजयासाठी सर्व शिवसैनिक प्रचारात उतरले आहेत. मुख्यमंत्री शिंदे यांनी शिवसैनिकांना मार्गदर्शन केले. मुख्यमंत्री पहाटे चार वाजेपर्यंत काम करत असल्याचे पाहून शिवसैनिकांना आणखी काम करण्याची प्रेरणा मिळाली. शिवसैनिक तीन दिवस रात्रीचा दिवस करुन प्रचार करतील.

### पहाटेचार वाजता मुख्यमंत्री भेटल्याने शिवसैनिकांमध्ये उत्साह...

» मुख्यमंत्री एकनाथ शिंदे झोकून देवून काम करत आहेत. राज्याच्या विकासासाठी चोवीस तास काम करतात. मुख्यमंत्री शिंदे यांनी प्रत्येक पदाधिका-यांशी संवाद साधला. सर्वांकडून चिंचवडचा आढावा घेतला. पहाटे चार वाजेपर्यंत मुख्यमंत्री शिंदे आढावा घेत होते. चर्चा करत होते. पहाटे चार वाजता मुख्यमंत्री भेटल्याने शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. पोटनिवडणुकीत पूर्ण ताकदिनीशी काम करण्याची ग्वाही सर्व पदाधिका-यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना दिली.

---

# भाजपसह गद्दारांना धडा शिकवा!

## » युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे : वाकड परिसरात बाईक रॅली

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**माणुसकी आणि विश्वास यांच्या पाठीत खंजीर खुपसून चाळीस गद्दारांनी भाजपला हाताशी धरून शिवसेनेला संपविण्याचा प्रयत्न चालविला आहे. मात्र शिवसेना कधीच संपणार नसून ती अधिक ताकदीने उभी राहील. शिवसेनेला संपविण्याचा प्रयत्न करणाऱ्या गद्दारांना आणि भाजपला धडा शिकविण्याची संधी चिंचवडच्या पोटनिवडणुकीच्या निमित्ताने मिळाली आहे. बेईमान आणि गद्दारांना धडा शिकविण्यासाठी शिवसैनिकांनी जिवाचे रान करून नाना काटे यांना विजयी करावे, असे आवाहन युवा सेनेचे प्रमुख आदित्य ठाकरे यांनी केले.**



युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे व विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत चिंचवड विधानसभेतील महाविकास आघाडीचे उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या बाईक रॅलीदरम्यान उपस्थितांशी संवाद साधताना ठाकरे बोलत होते.

थेरगावमधील गणेश मंदिरापासून बाईक रॅलीला सुरुवात करण्यात आली. यावेळी महाविकास आघाडीतील विविध पक्षांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह, कार्यकर्ते व कट्टर शिवसैनिकांनी या रॅलीसाठी मोठी गर्दी केली होती.

जुलमी हुकूमशहाच्या बळावर संपूर्ण पक्षाचे अपहरण करण्याचा डाव आखण्यात आला. परंतु जनतेच्या मनातील प्रेम आणि निष्ठा याची चोरी कशी करणार? अलीबाबा आणि त्याच्या ४० चोरांना धडा शिकवण्याची संधी या निवडणुकीच्या रूपाने चिंचवडकरांना मिळाली आहे. त्यांची लढाई सत्तेसाठी आहे तर आपली लढाई ही सत्य आणि लोकशाहीसाठी आहे.

त्यामुळे ठाकरे या नावावर प्रेम करणाऱ्या आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर प्रेम असणाऱ्या सर्व शिवसैनिकांनी नाना काटे यांना विजयी करून आपली ताकद दाखवून द्यावी.

> **एका व्यक्तीच्या राक्षसी महत्वाकांक्षेमुळे राज्यात सत्तांतर घडले. शिवसेना संपवण्याची खेळी याच व्यक्तीला हाताशी धरून भाजपच्या नेत्यांनी केली आहे. त्याचा बदला घेण्याची संधी चिंचवडच्या निवडणुकीमुळे प्राप्त झाली आहे. त्यामुळे बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारावर प्रेम करणाऱ्या सच्चा शिवसैनिकांनी नाना काटे यांच्या विजयासाठी जीवाचे रान करावे.**
> **- आदित्य ठाकरे, युवा सेना प्रमुख.**

# उद्धव सेने पुढील आव्हाने!



भाष्य
नितीन सावंत
91 9892514124



निवडणूक आयोगाचा अपेक्षित निर्णय आला. अर्थातच त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सेनेत आनंद आहे. शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण ही निशाणी निवडणूक आयोगाच्या कृपेने त्यांना मिळाली आहे. अर्थातच निवडणूक आयोगाचा हा निर्णय राज्यातील सामान्य जनतेला आवडलेला नाही. परंतु राजकारणात कोणतीही गोष्ट ही सामान्य सामान्य जनतेच्या मनाप्रमाणे घडत नसते तर ती सत्ताधारी पक्षाच्या इच्छेनुसार घडत असते. सुरुवातीला सत्ताधारी भाजपने शिवसेना फोडण्याचा प्रयोग केला हा प्रयोग यशस्वी झाला. पण राज्यातील जनमताचा कानोसा घेतला असता एकनाथ शिंदे हे आपल्या फारसे उपयोगी पडणार नाहीत, हे सत्ताधारी भाजपच्या लक्षात आले. त्यामुळेच आता भाजपला अर्थातच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांना निवडणूक आयोगाची मदत घ्यावी लागली. निवडणूक आयोगाचा हा निर्णय एकतर्फी नाही यावर कोणीही विश्वास ठेवणार नाही. परंतु या निर्णयामुळे भाजप राज्यात 40 प्लस जाऊ शकेल हे सध्या तरी शक्य नाही. महाराष्ट्रात 40 प्लस आणि देशात चारशे प्लस असा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांचा निर्धार आहे.

निवडणूक आयोगाच्या या निर्णयामुळे एकनाथ शिंदे यांना शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण ही निशाणी मिळाली आहे. मात्र विजय मिळवण्यासाठी फक्त नाव आणि निशाणी पुरेशी नसते. त्यासाठी तळागाळात संघटना असावी लागते. मंत्री एकनाथ शिंदे यांना महाशक्तीचा पाठिंबा असला तरी त्यांची संघटना सध्या तरी खोलवर रुजलेली नाही. संघटना तळागाळात पोहोचवण्यासाठी एक संघटनात्मक रचना असावी लागते. ही रचना तर नाहीत परंतु सामील झालेले सर्व हौशे,गवशे आणि नवशे असल्याचे सिद्ध झाले आहे.जाहीर सभाना गर्दी जमवणे सोपे असते मात्र मतपेटीत ती रूपांतर करणे यासाठी संघटना ही आवश्यक असते. एवढ्या कमी वेळात संघटना उभारणे एकनाथ शिंदे यांच्यासाठी सोपी गोष्ट नाही. संघटना जर एकनाथ शिंदे यांच्यासोबत आली असती तर निवडणूक आयोगाचा हा प्रयोग करण्याची महाशक्तीला गरज पडली नसती.

या निर्णयामुळे उद्धव ठाकरे यांना अर्थातच सहानुभूती मिळाली आहे. मुळात सहानुभूतीवर आरुढ होण्याचा उद्धव ठाकरे यांच्या शिवसैनिकांचा स्वभाव नाही. मैदानात लढून विजय मिळवण्याचा शिवसैनिकांचा मार्ग असतो. परंतु पक्षात राहण्यासाठी निष्ठावंत आणि लढण्यासाठी सामान्य शिवसैनिक असे उद्धव ठाकरे यांचे गणित असते. 2014 साली लोकसभेत आपला स्वार्थ साध्य झाल्यानंतर भारतीय जनता पक्षाने शिवसेनेची युती तोडली आणि विधानसभेत ते स्वतंत्र लढले. यावेळी शिवसेनेने ऐनवेळी स्वतंत्रपणे लढून 64 जागा मिळवल्या. भारतीय जनता पक्षाला बहुमताचा आकडा गाठता आला नाही. शिवसेनेकडे विरोधी पक्ष नेते पद आले. 1990 पासून निवडून येणाऱ्या निष्ठावंताना डावलून उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्या पारड्यात वजन टाकले. विरोधी पक्षनेते पदी एकनाथ शिंदे यांना संधी दिली. एकनाथ शिंदे हे 2004 साली विधानसभेत आले आणि 2014 साली शिवसेना पक्षाचे विधिमंडळ नेते झाले. त्याचेच परिणाम आता उद्धव ठाकरे यांना भोगावे लागत आहेत.फक्त सहा महिने विरोधी पक्षात राहिल्यानंतर उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने शिवसेना हा पक्ष सत्तेत सामील झाला. तेव्हा जर शिवसेना सत्तेत सामील झाली नसती तर आता सर्वाधिक आमदारांची संख्या अर्थातच उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेची असती. त्यावेळी भाजपने शेवटच्या क्षणी युती तोडून शिवसेनेला बाजूला केले तरीही नाक मुठीत धरून शिवसेना भाजपच्या मागे फरफटत गेली.

उपमुख्यमंत्री पद सोडा परंतु नगर विकास, गृह , गृहनिर्माण आणि महसूल यासारखी महत्त्वाची खाती ही भाजपने त्यावेळी स्वतःकडे ठेवली. त्यावेळी उद्धव ठाकरे यांनी हिंदुत्वासाठी युती केली की आमदारांच्या दबावामुळे युती केली हे त्यांनाच ठाऊक. उद्धव ठाकरे यांना आणि शिवसेनेला त्यावेळी संघटनात्मक पाठिंबा होताच त्याचबरोबर मतदारही त्यांच्यासोबत राहिले. त्यांच्या या धरसोड वृत्तीमुळेच शिवसेनेवर एवढे मोठे संकट उभे ठाकले आहे. गृहमंत्री अमित शहा मातोश्रीवर भेटायला गेल्याबरोबर उद्धव ठाकरे हे त्यांना शरण गेले आणि लगेचच पुढच्या लोकसभा निवडणुकीसाठी युती करून मोकळे झाले. त्याचाच फटका शिवसेनेला विधानसभेत बसला. भाजपासोबत एकत्र लढूनही त्यांचे संख्याबळ 64 वरून 56 वर आले. भाजपचा घोडा 104 वरच अडखळला. मात्र उद्धव ठाकरे यांनी 2009 चे उट्टे काढले त्यामुळेच भाजपची अस्वस्थता वाढली.

आत्तासुद्धा एकनाथ शिंदे भाजपसोबत असले तरी मुंबई महानगरपालिका निवडणुकीत आपल्याला विजय मिळत नाही हे भाजप नेत्यांच्या लक्षात आल्याने त्यांनी हा निवडणूक आयोगाचा प्रयोग केला आहे.

## संपादकीय »

### पेच नातेसंबंधांचा..

***स्त्री-पुरुष ही खरे तर निसर्गाची सुंदर पण दोन टोके असलेली निर्मिती. ते दोघे एकत्र येऊन जी काही जीवनाची निर्मिती करतात, त्यावर माणसाच्या जगाचा डोलारा हजारो वर्षे उभा आहे. एकाच वेळी आदिम आणि नित्यनूतन, रसरशीत असे हे नाते.***

वसईकर श्रद्धा वालकरची दिल्लीत तिच्या कथित मित्राने केलेली निर्घृण हत्या दुर्मिळातले दुर्मीळ प्रकरण मानले जात असतानाच हरियाणातील झज्जर इथली निक्की यादव आणि मुंबईजवळ पालघर येथील मेघा या दोघींच्या त्यांच्या लिव्ह इन नातेसंबंधातील जोडीदारांनी केलेल्या हत्या या हिंसेच्या टोकाचे हिडीस स्वरूप दाखवणाऱ्या आणि म्हणूनच प्रत्येक सहृदयी माणसाचे मन विदीर्ण करणाऱ्या आहेत. निदान भारतात तरी ते कसकसे विकसित होत गेले याची झलक 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' या इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या पुस्तकातून पाहायला मिळते. प्रचलित विवाहसंस्था हे त्याचे त्यातल्या त्यात आधुनिक रूप असले तरी गेल्या काही वर्षांमध्ये आपल्याकडे रूढ होत असलेली लिव्ह इन रिलेशनशिप हे या नातेसंबंधाला मिळालेले नवे वळण म्हणता येईल.

## कॉपीमुक्त परीक्षा खरंच शक्य आहेत का?

**कॉपी करण्याच्या वृत्तीला भ्रष्ट व्यवस्थेची साथ मिळत असल्याने कॉपीमुक्त परीक्षा ही पोकळ घोषणाच ठरण्याची चिन्हे आहेत.**

दरवर्षी १० वी १२ वीच्या परीक्षा जवळ आल्या की सरकारमार्फत कॉपीमुक्त परीक्षेची टिमकी वाजविण्यात येते. कोविडमुळे गेल्या दोन वर्षांत शिक्षणव्यवस्थेत प्रचंड गोंधळ उडाला. या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या १० वी-१२ वीच्या परीक्षा आता सुरू होत आहेत. परीक्षाकाळात राज्यात १० वी व १२ वीच्या परीक्षा केंद्रांवर होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी 'कॉपीमुक्ती अभियान' राबविण्यात येणार आहे, असे राज्य सरकारने जाहीर केले आहे. हे अभियान चार नियमांच्या जोरावर राबविले जाणार आहे. यात पोलीस बंदोबस्तावर भर देण्यात येणार आहे. परीक्षा केंद्राच्या ५० मीटरच्या परिघात परीक्षाप्रक्रियेशी संबंध नसणाऱ्या व्यक्तींना प्रवेश दिला जाणार नाही. अतिसंवेदनशील, संवेदनशील, सर्वसाधारण असे परीक्षा केंद्रांचे वर्गीकरण करण्यात येणार आहे. कलम १४४ अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश देण्यात येणार आहेत. ५० मीटरच्या आतील सर्व झेरॉक्स दुकाने बंद ठेवली जातील, असे अनेक निर्बंध घातले जाणार आहेत. खरा प्रश्न आहे तो अंमलबजावणीचा! नियमावलीचे काटेकोर पालन होणार का आणि परीक्षा खरोखरच कॉपीमुक्त होणार का?अलीकडच्या काळात दहावी-बारावीच्या परीक्षांना पूर्वीसारखे महत्त्व राहिलेले नाही या परीक्षांचा उपयोग केवळ पुढच्या वर्गात प्रवेश मिळवण्याइतपतच राहिला आहे. कारण अभियांत्रिकी आणि वैद्यकीय महाविद्यालयांचे प्रवेश हे नीट, जेईई यांसारख्या प्रवेश परीक्षांवर आधारित असतात. यात बारावीच्या गुणांना काही किंमत राहत नाही. नवीन शैक्षणिक धोरणानुसार तर मूल्यमापन प्रणालीद्वारे परीक्षा होणार आहेत. अर्थात याची सुरुवात पुढील वर्षापासून होणार असली तरी अद्याप याबद्दल पुरेशी स्पष्टता नाही. त्याचा निश्चित आराखडा एनईपी-२०२० म्हणजेच नवीन शैक्षणिक धोरणामध्ये अजून तरी नमूद केला गेलेला नाही.



कॉपीमुक्त परीक्षेचा इतिहास पाहिल्यास लक्षात येईल की बोर्डाचे कॉपीमुक्त परीक्षा किंवा 'गैरमार्गाविरुद्ध लढा' हे अभियान म्हणजे निव्वळ धूळफेक आहे. केवळ बोभाटा. प्रत्यक्ष कारवाई शून्य. सरकारी धाटणीची केवळ कृतिशून्य घोषणा असेच म्हणता येईल. याचे उदाहरण द्यायचे झाले तर गल्लीपासून दिल्लीपर्यंत सर्वपक्षीय राज्यकर्ते, प्रशासन, नागरिक- सामाजिक संस्था भ्रष्टाचारमुक्तीचा डंका पिटत असतात, मात्र आजही भ्रष्टाचार भारतीय व्यवस्थेचा अंगभूत घटक आहे, कारण भ्रष्टाचारमुक्ती ही केवळ उक्ती आहे, कृती नाही. अगदी तसेच कॉपीमुक्त परीक्षांबाबत म्हणता येऊ शकेल.

## ।। अभंगवाणी ।।



पवित्र सोंवळीं ।  
एक तीं च भूमंडळीं ॥१॥  
ज्यांचा आवडता देव ।  
अखंडित प्रेमभाव ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ፡ *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ፡ MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)


# कपिल सिब्बल यांचा न्यायालयात तिखट युक्तिवाद!

## विधिमंडळ पक्ष की राजकीय पक्ष, महत्त्वाचं काय?

। नाशिक महाईन्यूज ।

**शिंदे गटातील १६ आमदार पात्र ठरणार की अपात्र? याचा निर्णय घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात शिंदे गट आणि ठाकरे गट आमने-सामने उभे ठाकले आहेत. या याचिकेवर आजपासून सुनावणी सुरू झाली आहे. तीन दिवस याचिकेवर सुनावणी होणार असून त्यानंतर न्यायालयाकडून निर्णय येणं अपेक्षित आहे. महाराष्ट्रात दोन्ही गटांकडून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप सुरू असताना दुसरीकडे दिल्लीत सर्वोच्च न्यायालयात ठाकरे गटाकडून कपिल सिब्बल यांनी आज पहिल्या दिवशी युक्तिवादादरम्यान विषयाची मुद्देसूद मांडणी केली. या युक्तिवादादरम्यान कपिल सिब्बल यांनी शिंदे गटावर मोठं प्रश्नचिन्ह उपस्थित करत थेट राज्य सरकारबाबत महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला.**

आज सुनावणीच्या पहिल्या दिवशी कपिल सिब्बल यांनी ठाकरे गटाकडून अनेक वैधानिक मुद्द्यांची मांडणी करण्यात आली. यामध्ये विधानसभा अध्यक्षांचे अधिकार, पक्ष म्हणून शिवसेनेचे अधिकार, पक्षाध्यक्ष म्हणून उद्धव ठाकरेंचं अधिकार, एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासमवेत शिंदे गटातील आमदारांची बंडखोरी, त्याची वैधता अशा अनेक मुद्द्यांवर ऊहापोह करण्यात आला. यावेळी कपिल सिब्बल यांनी एकनाथ शिंदेंनी आपणहून घेतलेल्या पक्षनेतेपदावर तीव्र शब्दांत आक्षेप घेतला.पक्षनेत्याची निवड कधी, कुठे, कशी झाली?



एकनाथ शिंदेंची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्याची प्रक्रिया पक्षाच्या नियमानुसार झाली नसल्याचा मुद्दा सिब्बल यांनी उपस्थित केला. "विधिमंडळ पक्षनेता हा एखाद्या पक्षातून निवडला जायला हवा. त्यासाठी पक्षाध्यक्षांनी विधानसभा अध्यक्षांच्या नावे पत्र द्यायला हवं. उदा. जेव्हा खर्गे काँग्रेसचे विधिमंडळ नेते झाले, तेव्हा सोनिया गांधींनी पत्र लिहिलं होतं. मग इथे कशाच्या आधारावर एकनाथ शिंदेंची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली?" असा सवाल सिब्बल यांनी उपस्थित केला आहे. "निवडणूक आयोगासमोरची याचिका जर आपण पाहिली, तर त्यानुसार १८ जुलैपर्यंत कोणत्याही पक्षाच्या कोणत्याही बैठकीसंदर्भात कसलाच उल्लेख नाही. याचा अर्थ हे सगळे निर्णय पक्षाबाहेर घेतले जात होते", असा युक्तिवाद सिब्बल यांनी यावेळी केला.

### मुख्य प्रतोद आणि उपप्रतोदाची नेमणूक

.दरम्यान, युक्तिवाद करताना कपिल सिब्बल यांनी मुख्य प्रतोद आणि उपप्रतोद यांच्या नियुक्तीबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. "मुख्य प्रतोद आणि उपप्रतोद यांची नियुक्ती राजकीय पक्षाकडून केली जाते. पण शिंदे गटाचं म्हणणं की पक्षात फूट पडलीच नाहीये. तेच खरी शिवसेना आहेत, असा त्यांचा दावा आहे. पण सध्याच्या परिस्थितीत ते फक्त पक्षात फूट पडली तरच शक्य आहे. नाहीतर फक्त एका व्यक्तिकडून दुसऱ्या व्यक्तीकडे पक्षाध्यक्षपद जाण्याइतकी ती सामान्य प्रक्रिया ठरते", असा युक्तिवाद सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयात केला.

### "तुम्हाला घटनात्मक पेच सोडवावा लागणार"

."विधिमंडळात बहुमत असणारा एक गट स्वतःला पक्ष म्हणवत आहे. स्वतःच्या फायद्यासाठी निर्णय घेत आहे. तुम्हाला याच घटनात्मक पेचावर निर्णय घ्यावा लागणार आहे", असं कपिल सिब्बल आपल्या युक्तिवादात म्हणाले.

"या प्रकाराचा देशाच्या राजकीय स्थितीवर मोठा परिणाम होऊ शकतो. कारण आता विधिमंडळ पक्षाला (पक्षाचे विधिमंडळातील लोकप्रतिनिधी) वाटू लागलं आहे की तो राजकीय पक्ष आहे आणि राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना आपण काढून टाकू शकतो. उद्या खर्गे असं म्हणू शकतात का की 'मी आता नेता आहे. माझ्याकडे अमुक खासदार आहेत?" असा सवाल सिब्बल यांनी उपस्थित केला.

# मत्स्य व्यवसायाला चालना देणारे उद्योग महाराष्ट्रात आणणार!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ससून डॉक येथील आयोजित कार्यक्रमात प्रतिपादन

। मुंबई। महाईन्यूज ।

**महाराष्ट्रातले मच्छिबांधव दररोज उत्तुंग लाटांशी सामना करून आपला जीव धोक्यात घालून मच्छिमारीचा व्यवसाय करतात. येणाऱ्या काळात महाराष्ट्रात हरित आणि पर्यावरणपूरक उद्योगाबरोबरच मत्स्य व्यवसायाला चालना देणारे उद्योग महाराष्ट्रात आणले जातील असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ससून डॉक येथे आयोजित कार्यक्रमात सांगितले. गेल्या काही काळात एनडीआरएफ मार्फत मच्छिमारांचे नुकसान झाल्यास त्यांना देण्यात येणारी मदत कमी असल्याचे दिसून येत आहे, त्यामुळे मदतीबाबतचे निकष बदलण्यासाठी आपण स्वतः प्रयत्न करणार असल्याचे केंद्रीय मत्स्य व्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय मंत्री परशोत्तम रुपाला यांनी सांगितले.**

मच्छिमारांसाठी मत्स्यव्यवसाय विषयक कल्याणकारी योजनांच्या लाभासंबंधी केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने सागर परिक्रमेचा सांगता समारंभ (तृतीय चरण) कार्यक्रम मुंबई शहर



जिल्ह्यातील नवीन भाऊचा धक्का येथे आज आयोजित करण्यात आला होता. यावेळी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी केंद्रीय मत्स्य व्यवसाय पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय मंत्री परषोत्तम रूपाला, सविता रुपाला, विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर, मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार, आमदार महेश बालदी, केंद्रीय मत्स्य व्यवसाय विभागाचे सचिव जे एन स्वेन, मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. अतुल पाटणे यांच्यासह ससून डॉक येथील स्थानिक मच्छिमार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले की, महाराष्ट्राला 720 किमी लांबीचा विस्तीर्ण असा समुद्रकिनारा लाभलेला असून येणाऱ्या काळात पर्यटन आणि मत्स्य व्यवसायाला चालना देण्याचे काम राज्य शासन प्राधान्याने करणार आहे.

याशिवाय मुंबईतील कोळीवाडयाचे सुशोभीकरण, कोळीवाडयांचा पुर्नविकास यालाही प्राधान्य देण्यात येईल. दर्याचा राजा अशी ओळख असणाऱ्या कोळीबांधवांचा विकास, त्यांना मिळणाऱ्या सोयीसुविधा यासह त्यांची सुरक्षा याला सुध्दा आगामी काळात प्राधान्य देण्यात येईल. डिझेल परतावा, कोल्ड स्टोरेजची सुविधा यासारखे प्रश्न मार्गी लावण्यात येतील. काही दिवसांपूर्वी 10 लोकांच्या मच्छिजाळीचे नुकसान झाले होते. 10 मच्छिमारांची जाळी जळाल्याने त्यांना मत्स्यव्यवसाय करण्यास अडचण येत होती. त्यामुळे ही बाब लक्षात घेऊन मुख्यमंत्री यांनी त्या 10 मच्छिमारांना जाळीसाठी 54 लाख रुपये मुख्यमंत्री सहायता निधीतून देण्यात येतील असे या कार्यक्रमात जाहीर केले. केंद्रीय मंत्री रुपाला म्हणाले की, मत्स्य संपदा साठवणूक करणे व वितरण करणे यासाठी प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना राबविण्यात येत आहे. मत्स्य संपदा योजनेसाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 20 हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध देण्यात येत आहे. या योजनेचा आणि इतर योजनांचा फायदा येणाऱ्या काळात महाराष्ट्रातील मच्छिमारांनी घ्यावा.

### पर्यटन आणि मत्स्य व्यवसायाला चालना

**मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले की, महाराष्ट्राला 720 किमी लांबीचा विस्तीर्ण असा समुद्रकिनारा लाभलेला असून येणाऱ्या काळात पर्यटन आणि मत्स्य व्यवसायाला चालना देण्याचे काम राज्य शासन प्राधान्याने करणार आहे.याशिवाय मुंबईतील कोळीवाडयाचे सुशोभीकरण, कोळीवाडयांचा पुर्नविकास यालाही प्राधान्य देण्यात येईल. दर्याचा राजा अशी ओळख असणाऱ्या कोळीबांधवांचा विकास, त्यांना मिळणाऱ्या सोयीसुविधा यासह त्यांची सुरक्षा याला सुध्दा आगामी काळात प्राधान्य देण्यात येईल. डिझेल परतावा, कोल्ड स्टोरेजची सुविधा यासारखे प्रश्न मार्गी लावण्यात येतील.**

# डॉ. शंकर लोकरे महाराज यांची राष्ट्रीय स्तरावर प्राच्यविद्या शिरोमणी पुरस्कारासाठी निवड

## वास्तू-अंकशास्त्र शोधनिबंध व अध्यात्मिक, सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनिय कार्याबद्दल होणार गौरव

। सातारा। महाईन्यूज ।

श्री जैन प्राच्यविद्या अनुसंधान संगठन, इंदौर (मध्य प्रदेश) संस्थेकडून श्री स्वामी दत्त फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्यचे संस्थापक -अध्यक्ष डॉ. शंकर लोकरे (आण्णाजी) यांची राष्ट्रीय पातळीवर प्राच्यविद्या शिरोमणी पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. श्री जैन प्राच्यविद्या अनुसंधान संगठनच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती आभा जैन व राष्ट्रीय समितीकडून शोधपत्र, वास्तू-अंकशास्त्र शोधनिबंध व अध्यात्मिक, सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनिय कार्याबद्दल ही निवड करण्यात आली आहे.



दि. 5 मार्च रोजी इंदौर (मध्यप्रदेश) येथे होणाऱ्या प्राच्यविद्या अधिवेशन व अलंकरण समारंभात डॉ. श्री. शंकर लोकरे (आण्णाजी) यांना मान्यवरांच्या हस्ते प्राच्यविद्या शिरोमणी हा सर्वोच्च पुरस्कार देवून सन्मान करण्यात येणार आहे. हा पुरस्कार भारतातील सर्वोच्च विद्वान 5 व्यक्तींनाच दिला जातो.

### अंकशास्त्रातील गुढ शोधनिबंध कौतुकास्पद

श्री स्वामी दत्त फाऊंडेशन आणि श्री स्वामी दत्त अध्यात्मिक उन्नती केंद्राच्या माध्यमातून महाराष्ट्रात सामाजिक आणि अध्यात्म क्षेत्रात अविरत वेगवेगळे उपक्रम लोकांपर्यंत पोहोचवून अंधश्रद्धा निर्मुलन करुन सनातन वैदिक मंत्राचा प्रचार व प्रसार करत आहेत.तसेच डॉ. शंकर लोकरे (आण्णाजी) यांनी सादर केलेला ज्योतिष, वास्तू आणि अंकशास्त्रातील गुढ शोधनिबंध राष्ट्रीय स्तरावर कौतुकास्पद ठरला आहे. याआधी श्री स्वामी दत्त फाऊंडेशनचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. शंकर लोकरे (आण्णाजी ) यांना 34 राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले आहे.

# राहुल गांधींना चीनविषयी चांगले ज्ञान!

## मोदी सरकारमधील मंत्र्यांचं मोठं विधान

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांना परराष्ट्र धोरणाविषयी फारशी माहिती नाही आणि त्यांनी अधिक शिकण्याची गरज आहे, अशा शब्दांत परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी राहुल गांधी यांच्यावर निशाणा साधला आहे. भारत सरकारच्या चीनबाबत संरक्षणात्मक नितीवर राहुल गांधींकडून करण्यात येत असलेल्या टीकेला जयशंकर यांनी कठोर शब्दात प्रत्युत्तर दिलं**

चीनच्या सीमेवर शांततेच्या काळातील ही इतिहासातील सर्वात मोठी तैनाती आहे. आम्ही तेथे मोठ्या प्रमाणात सैनिक तैणात केले आहेत.

या सरकारने सीमेवरील पायाभूत सुविधांच्या खर्चात पाच पटीने वाढ केली आहे. आता सांगा कोण बचावात्मक आणि उदार आहे? खरं च खरं कोण बोलतंय? गोष्टींचं योग्य चित्रण कोण करतंय? परराष्ट्र मंत्री जयशंकर यांनी राहुल गांधी यांच्या परराष्ट्र धोरणावरील वक्तव्यावर निशाणा साधत म्हटले आहे की, जर त्यांना चीनविषयी चांगले ज्ञान असेल तर ते काँग्रेसचे म्हणणे ऐकण्यास तयार आहेत.

जयशंकर म्हणाले की, मी माझ्या बचावात एवढेच सांगू शकतो की, मी चीनमध्ये सर्वात जास्त काळ राजदूत राहिलेलो आहे. या सीमाप्रश्नांना मी बराच काळ सामोरे जात आहे. मी असे म्हणत नाही की मी सर्वात ज्ञानी व्यक्ती आहे, परंतु तेथे काय आहे याबद्दल माझे आकलन चांगले आहे.



जर त्यांच्याकडे (राहुल) चीनविषयी चांगले ज्ञान असेल तर मी ऐकण्यास नेहमीच तयार आहे. माझ्यासाठी आयुष्य ही शिकण्याची प्रक्रिया आहे.चीनने गेल्या वर्षी पँगाँग सरोवरावर पूल बांधल्याबद्दल काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांच्या नाराजीचा उल्लेख करताना परराष्ट्र मंत्री म्हणाले की, १९६२ च्या युद्धापासून हा भाग चीनच्या ताब्यात आहे.

---

# निवडणूक आयोग बरखास्त करण्याच्या उद्धव ठाकरेंच्या मागणीला भाजपाच्या नेत्याचा पाठिंबा!

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

शिवसेनेत बंड करून बाहेर पडलेल्या १६ सदस्यांच्या अपात्रतेचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असतानाही केंद्रीय निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्हावर निकाल देण्यात घाई केली आहे. आयोगाचा हा निकाल अन्यायकारक असून केंद्रीय निवडणूक आयोग बरखास्त करावा आणि त्यावरील नियुक्त्या निवडणुकीच्या माध्यमातूनच करण्याची मागणी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सोमवारी केली. त्यांच्या या मागणीला भाजपा खासदार सुब्रमण्यम स्वामी यांनी पाठिंबा दिला आहे. यामुळे एकप्रकारे भाजपाला घरचा आहेर मिळाल्याचं बोललं जात आहे.

भाजपा खासदार सुब्रमण्यम स्वामी हे कायमच त्यांची विविध विधानं तसेच भूमिकांमुळे कायम चर्चेत असतात. अनेकदा त्यांच्या भूमिका, त्यांची विधानं ही त्यांच्याच पक्षाच्या धोरणाच्या विरोधात असल्याचे दिसून आले आहे. एवढच नाहीतर थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबतही त्यांनी अनेकदा परखड मत व्यक्त केलेलं आहे. आता महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोग बरखास्त करण्याच्या निर्णयासही त्यांनी पाठिंबा दर्शवल्याने, राजकीय वर्तुळात याची जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे.मुख्य निवडणूक आयुक्तांना पदावरून हटवण्याच्या




### निवडणूक आयोगच बरखास्त करण्याची मागणी

**»मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपलाच पक्ष खरी शिवसेना असल्याचा करीत निवडणूक आयोगाकडे पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण चिन्हाची मागणी केली होती. केंद्रीय निवडणूक आयोगाने गेल्याच आठवड्यात शिंदे यांची मागणी मान्य करीत शिवसेना हे पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण हे चिन्ह शिंदे गटाला बहाल करण्याचा आदेश दिला. त्यामुळे संतापलेल्या ठाकरे यांनी आज निवडणूक आयोगावर पक्षपातीचा आरोप केला. निवडणूक आयोगच बरखास्त करण्याची मागणी केली.**

उद्धव ठाकरे यांच्या मागणीला माझा पाठिंबा आहे. कारण, त्यांचा कार्यकाळा अर्थमंत्रालयात संशायस्पद होता." असं सुब्रमण्यम स्वामी यांनी ट्वीटद्वारे म्हटलं आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपलाच पक्ष खरी शिवसेना असल्याचा करीत निवडणूक आयोगाकडे पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण चिन्हाची मागणी केली होती. केंद्रीय निवडणूक आयोगाने गेल्याच आठवड्यात शिंदे यांची मागणी मान्य करीत शिवसेना हे पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण हे चिन्ह शिंदे गटाला बहाल करण्याचा आदेश दिला. त्यामुळे संतापलेल्या ठाकरे यांनी आज निवडणूक आयोगावर पक्षपातीचा आरोप केला. निवडणूक आयोगच बरखास्त करण्याची मागणी केली. पक्षाचे नाव आणि चिन्ह चोरणे हा विरोधकांचा पूर्वनियोजित कट असून अशीच परिस्थिती उद्या अन्य पक्षांवरही आणू शकतात. त्यामुळे सन २०२४ची लोकसभा निवडणूक ही देशातील कदाचित शेवटची निवडणूक ठरू शकते असा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला आहे.

---

# भविष्य निर्वाह निधीमध्ये अतिरिक्त पेन्शनचा पर्याय

## 8.33 टक्के अतिरिक्त रक्कम भरण्याची मुभा

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**भविष्य निर्वाह निधी योजनेअंतर्गत (ईपीएस) अतिरिक्त भविष्य निर्वाह निधी मिळविण्याचा (पेन्शन) पर्याय कर्मचाऱ्यांना आता उपलब्ध झाला आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने (ईपीएफओ) याबाबतची प्रक्रिया प्रसिद्ध केली आहे. भविष्य निर्वाह निधीमध्ये एकूण योगदानाच्या ८.३३ टक्के अतिरिक्त रक्कम देण्याचा पर्याय कर्मचाऱ्यांना असेल.**

सर्वोच्च न्यायालयाने दिलेली ४ महिन्यांची मुदत संपण्यास १५ दिवस शिल्लक असताना ईपीएफओने परिपत्रक काढून सूचना जारी केल्या आहेत. नोव्हेंबर २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (सुधारित) योजना २०१४ ग्राह्य ठरवली होती. ईपीएसमधील सुधारणेमुळे पेन्शनपात्र वेतनाची मर्यादा प्रतिमाह ६,५०० रुपयांवरून १५,००० रुपये अशी वाढवण्यात आली आहे, तसेच या मर्यादेपेक्षा वेतन अधिक असल्यास सदस्यांना त्यांच्या नियोक्त्याबरोबर प्रत्यक्ष वेतनाच्या ८.३३ टक्के रक्कम योगदान देण्याची परवानगी देण्यात आली आहे.

१ सप्टेंबर २०१४ आणि त्यानंतर सदस्य झालेले कर्मचारी आणि त्यांच्या नियोक्त्यांना अधिक पेन्शनसाठी संयुक्तरीत्या अर्ज करावा लागणार आहे.

### अशी असेल प्रक्रिया

**» वाढीव पेन्शनकरिता अर्ज करण्यासाठी ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. संबंधित यूआरएलमध्ये आवश्यक बदल लवकरच केले जातील, असे ईपीएफओकडून सांगण्यात आले आहे. अर्ज नोंदवून डिजिटली नोंद (लॉग) केल्यानंतर अर्जदाराला पावती क्रमांक दिला जाईल. यासंबंधीचे निर्णय संबंधित विभागीय अधिकाऱ्याकडून घेतले जातील आणि अर्जदाराला ईमेल आणि एसएमएसद्वारे त्याची माहिती दिली जाईल. ज्या कर्मचाऱ्यांनी आधीच उच्च वेतनासाठी योगदान दिले आहे, पण औपचारिकता पूर्ण केलेली नाही त्यांना आता ईपीएफओ प्रादेशिक कार्यालयामध्ये अर्ज करावा लागेल.**

### 4.93 लाख सदस्य

**» डिसेंबर २०२२मध्ये भविष्य निर्वाह निधीमध्ये १४ लाख ९३ हजार नवे सदस्य झाले आहेत. गतवर्षी याच महिन्यातील सदस्यवाढीपेक्षा हा आकडा ३२ हजार ६३५ने (२ टक्के) जास्त आहे. कर्मचारी राज्य विमा महामंडळात (ईएसआयसी) डिसेंबर २०२२मध्ये १८.०३ लाख कर्मचारी नव्याने दाखल झाल्याचे केंद्रीय श्रम मंत्रालयाने जारी केलेल्या आकडेवारीत स्पष्ट झाले आहे.**

# "आजही मी तुला सर्वत्र..."

जान्हवी कपूर 5 वर्षांनंतरही आई श्रीदेवीच्या निधनाच्या दुःखातून बाहेर पडू शकलेली नाही. पुण्यतिथीपूर्वी तिने श्रीदेवी यांची आठवण काढली.

बॉलिवूडची दिग्गज अभिनेत्री श्रीदेवी यांचे पाच वर्षांपूर्वी २४ फेब्रुवारी रोजी दुबईमध्ये निधन झाले. आता आईची आठवण करून जान्हवी कपूरने एक भावनिक पोस्ट शेअर केली आहे.

जान्हवी कपूरने तिची आई श्री देवीसोबतचा एक फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केला आणि लिहिले की ती अजूनही तिला शोधत आहे. जान्हवीने म्हटले की, "मम्मा मी अजूनही तुला सगळीकडे शोधत आहे... सध्या मी ते सर्व करते आहे ज्याचा तुला अभिमान वाटेल...मी जे काही करते त्याची सुरूवात तुझ्यापासून करते आणि शेवटीही". जान्हवी कपूर हिच्या या पोस्टमध्ये अनेकांनी कमेंट केल्या आहेत. चाहतेही जान्हवी कपूर हिची पोस्ट वाचून भावनिक झाले आहेत. जान्हवीच्या या पोस्टवर बॉलिवूडच्या अनेक कलाकारांनी कमेंट केल्या आहेत. आथिया शेट्टी, वरुण शर्मा, करण जोहर, मनीष मल्होत्रा, रकुल प्रीत सिंह यांनी कमेंट केल्या आहेत. तसेच बोनी कपूर यांनीही श्रीदेवी यांच्या आठवणीमध्ये भावनिक पोस्ट शेअर केली आहे.

जान्हवीचा मिली हा चित्रपट काही दिवसांपूर्वीच रिलीज झाला होता. मिली या चित्रपटाचे जान्हवीने जोरदार प्रमोशनही केले होते. पण, या चित्रपटाकडे प्रेक्षकांनी पाठ फिरवली आणि जान्हवीचा मिली हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप गेला.



# इंटिमेट सीन नको रे बाबा! जन्नत जुबेर

जन्नत जुबेर ही टीव्हीवरील सर्वात लोकप्रिय बालकलाकार आहे. तिने अनेक मालिकांमध्ये मुख्य भूमिका साकारल्या आहेत. अभिनेत्रीने अनेक मालिकांमध्ये काम केले असले तरी ती नेहमीच इंटिमेट सीनच्या विरोधात राहिली आहे.

तुम्हाला आठवत असेल की 'तू आशिकी'मध्ये को-स्टार ऋत्विक अरोरासोबत तिचे किसिंग सीन होते. त्याला नकार दिल्यावर बराच गदारोळ झाला होता. या सीनला नकार देऊन जन्नत बरीच चर्चेत अली होती.

अलीकडेच जन्नत जुबेरने एका वृत्तवाहिनीला दिलेल्या लेटेस्ट मुलाखतीत याविषयी खुलेपणाने बोलले आहे. जन्नतने सांगितले की, तिच्या वडिलांनी स्क्रीनवर किसिंग सीन करण्यास मनाई केली होती.

अभिनेत्रीच्या वडिलांनी स्पष्टपणे सांगितले होते की ती वयाच्या 20 व्या वर्षीही किसिंग सीन करणार नाही.

जन्नत म्हणाली, "मला इंटिमेट सीनसाठी मर्यादेच्या खाली जायचे नव्हते. मी स्वतःसाठी एक रेषा काढली आहे. मी बघेन जर माझ्या कम्फर्ट झोनमध्ये असेल तर करेन, नाहीतर नाही.

जन्नत जुबेरने अनेक दिवसांपासून टीव्ही जगतापासून अंतर ठेवले आहे. आता तिला टीव्हीमध्ये काम करायचे नाही, असा खुलासा तिने काही काळापूर्वी केला होता. ओटीटीमध्ये इंटिमेट सीन्स असल्याने तिला काम करायला आवडणार नाही, असेही अभिनेत्रीने सांगितले होते.

मात्र, आता अभिनेत्रीने आपला निर्णय बदलला आहे. जन्नत म्हणते की अनेक बॉलिवूड स्टार्स देखील ओटीटीकडे वळत आहेत, त्यामुळे आता तीही ओटीटीमध्ये काम करण्यास तया आहे.जन्नत शेवटची टीव्हीवर 'खतरों के खिलाडी 12' मध्ये दिसली होती. 'कुल्चे छोले' या पंजाबी चित्रपटातून तिने चित्रपटांमध्येही प्रवेश केला आहे.



# बालकवींच्या मखमली शब्दांनी सजणार 'फुलराणी' सिनेमा..

बालकवींची ही प्रसिद्ध कविता समस्त मराठी जनांच्या हृदयात कायमची कोरली गेली आहे. रसिकांच्या कितीतरी पिढ्या या 'फुलराणी'ने फुलवल्या. आगामी 'फुलराणी' या मराठी चित्रपटातून ही अजरामर कविता गीतरूपाने आपल्या भेटीला येणार आहे. दिग्दर्शक विश्वास जोशी यांनी ही 'फुलराणी' आपल्यासमोर आणली असून या 'फुलराणी' चा अनोखा अंदाज २२ मार्चला आपल्याला चित्रपटगृहात अनुभवायला मिळणार आहे. यातील 'विक्रम राजाध्यक्ष' ही भूमिका अभिनेता सुबोध तर कोळी आगरी ठसकेबाज 'शेवंता' अभिनेत्री प्रियदर्शनी इंदलकर हिने साकारली आहे.

बालकवींची ही प्रसिद्ध कविता समस्त मराठी जनांच्या हृदयात कायमची कोरली गेली आहे. रसिकांच्या कितीतरी पिढ्या या 'फुलराणी'ने फुलवल्या. आगामी 'फुलराणी' या मराठी चित्रपटातून ही अजरामर कविता गीतरूपाने आपल्या भेटीला येणार आहे. दिग्दर्शक विश्वास जोशी यांनी ही 'फुलराणी' आपल्यासमोर आणली असून या 'फुलराणी' चा अनोखा अंदाज २२ मार्चला आपल्याला चित्रपटगृहात अनुभवायला मिळणार आहे. यातील 'विक्रम राजाध्यक्ष' ही भूमिका

अ भि ने ता सुबोध तर कोळी आगरी ठसकेबाज 'शेवंता' अभिनेत्री प्रियदर्शनी इंदलकर हिने साकारली आहे. संगीतकार निलेश मोहरीर यांनी या कवितेला अनोखा संगीतसाज दिला असून गायक हृषिकेश रानडे आणि गायिका वैशाली सामंत यांच्या स्वरांनी हे गीत सजलं आहे. गायक आणि गायिकेच्या अशा दोन्ही रूपात हे गीत ऐकता येणार आहे. 'फिनक्राफ्ट मिडिया' 'अमृता फिल्म्स' आणि 'थर्ड एस एंटरटेन्मेंट'ने 'फुलराणी... अविस्मरणीय प्रेम कहाणी' चित्रपटाची प्रस्तुती केली असून विश्वास जोशी, अमृता राव, श्वेता बापट चित्रपटाचे प्रस्तुतकर्ते आहेत. जाई जोशी, श्री.ए.राव, स्वानंद केळकर या चित्रपटाचे निर्माते आहेत.



# स्मृतीच्या झंझावाती खेळीने लावली विक्रमांची रांग!

## स्मृती मंधानाने आयसीसी महिला टी-20 विश्वचषक 2023 मध्ये सलग दुसरे अर्धशतक

**। मुंबई। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**टीम इंडियाची स्टार सलामीवीर स्मृती मंधानाचा उत्कृष्ट फॉर्म कायम आहे. दक्षिण आफ्रिकेत सुरू असलेल्या आयसीसी महिला टी-२० विश्वचषकात तिने आणखी एक अर्धशतक झळकावले आहे. मंधानाने सोमवारी आयर्लंडविरुद्ध ५६ चेंडूत ९ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ८७ धावा केल्या. या खेळीच्या जोरावर तिने अनेक विक्रमांना गवसणी घातली आहे.**

१..स्मृती मंधानाचे टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील हे २२ वे अर्धशतक आहे.

२.महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारतीय सलामीवीर म्हणून मंधानाच्या नावावर सर्वात मोठ्या खेळीचा विक्रम नोंदवला गेला आहे. तिने स्वतःचाच विक्रम मोडला. मंधानाने यापूर्वी २०१९ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध ८६ आणि २०१८ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध ८३ धावा केल्या होत्या.

३.दक्षिण आफ्रिकेच्या भूमीवर महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात मोठी खेळी करणारी मंधाना भारतीय खेळाडू ठरली आहे. तिच्या आधी हा विक्रम माजी कर्णधार मिताली राजच्या नावावर होता, जिने २०१८ मध्ये नाबाद ७६ धावा केल्या होत्या.

४.महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारताने प्रथमच दोन ५०+ भागीदारी केल्या. मंधानाने शफाली वर्मासोबत पहिल्या विकेटसाठी ६२ धावांची आणि हरमनप्रीत कौरसोबत दुसऱ्या विकेटसाठी ५२ धावांची






भागीदारी केली. महिला टी-२० विश्वातील एका सामन्यात पहिल्या आणि दुसऱ्या विकेटसाठी ५०+ भागीदारी करणारा भारत हा दुसरा संघ ठरला आहे. भारतापूर्वी ऑस्ट्रेलियाने २०१४ मध्ये पाकिस्तानविरुद्ध अशी कामगिरी केली होती.

५.स्मृती मंधाना ही महिला टी-२० आंतरराष्ट्रीय स्पर्धेत डेव्हिल्स नंबर (८७) वर बाद होणारी पहिली खेळाडू ठरली आहे. शतक गाठण्यासाठी १३ धावा कमी असल्याने हा एक अशुभ स्कोअर मानला जातो. विशेष म्हणजे, मंधानाने या अगोदर तिच्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात ८० चा टप्पा दोनदा ओलांडला होता. पण या क्रमांकावर ती कधीच पॅव्हेलियनमध्ये परतली नाही.

सामन्याबद्दल बोलायचे तर, आयसीसी महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेतील १८ वा सामना भारत आणि आयर्लंड संघात खेळला गेला आहे. या सामन्यात भारतीय संघाने डकवर्थ लुईस नियमानुसार ५ धावांनी विजय मिळवला. या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ६ बाद १५५ धावा केल्या होत्या.

# ऑस्ट्रेलियाला आणखी एक मोठा धक्का

## सिराजच्या वेगवान चेंडूमुळे डेव्हिड वॉर्नर मालिकेतून बाहेर

**।बंगाल । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

बॉर्डर-गावसकर मालिकेदरम्यान ऑस्ट्रेलिया संघाला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. कांगारू संघाचा धडाकेबाज फलंदाज डेव्हिड वॉर्नर पुढील दोन सामन्यांसाठी संघाबाहेर झाला आहे. वॉर्नर दुखापतीमुळे संघाबाहेर असल्याचे सांगण्यात येत आहे. दिल्ली कसोटीत त्याला दुखापत झाली होती, त्यानंतर तो दुसऱ्या डावात फलंदाजीलाही आला नव्हता.




### वॉर्नर मायदेशी परतणार

दिल्लीत खेळल्या गेलेल्या दुसऱ्या कसोटीदरम्यान वॉर्नरला भारतीय वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजचे दोन चेंडू लागले होते. सिराजचा एक चेंडू वॉर्नरच्या हाताला लागला आणि एक चेंडू त्याच्या डोक्याला देखील लागला होता. डोक्याला चेंडू लागल्याने वॉर्नर दिल्ली कसोटीतून बाहेर पडला होता. त्याच्या जागी मॅथ्यू रेनशॉ कनकशन बदली खेळाडू म्हणून आला होता. सिराजचा चेंडू वॉर्नरच्या हाताला लागल्याने वार्नरला हेअरलाइन फ्रॅक्चर झाल्याचे वृत्त आहे. त्यामुळे तो पुढील दोन कसोटी सामने खेळू शकणार नाही. भारत दौऱ्यातून बाहेर पडल्यानंतर वॉर्नर मायदेशी परतणार आहे.वॉर्नरपूर्वी वेगवान गोलंदाज जोश हेझलवूडला भारत दौऱ्यातून वगळण्यात आले होते. हेझलवूड पायाच्या दुखापतीने त्रस्त होता. भारत दौऱ्यावर त्याने या दुखापतीतून सावरण्यासाठी खूप प्रयत्न केले, पण तो या सामन्यासाठी तंदुरुस्त होऊ शकला नाही.

क्रिकेट ऑस्ट्रेलियाने आपल्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, “डेव्हिड वॉर्नरला भारताच्या कसोटी दौऱ्यातून वगळण्यात आले आहे. तो मायदेशी परतणार आहे. दिल्लीतील दुसऱ्या कसोटीत वॉर्नरला कोपराला दुखापत झाली आणि हेअरलाइन फ्रॅक्चर झाले होते. पुढील मूल्यमापनानंतर तो मायदेशी परतेल. त्याला रिहॅब आवश्यक आहे आणि आगामी सामन्यांना तो मुकेल.

### तिसरा सामना 1 मार्चपासून इंदूरमध्ये

**सध्या असा अंदाज आहे की, तो कसोटी मालिकेनंतर तीन एकदिवसीय सामन्यांसाठी भारतात परतेल.”कसोटी मालिकेबद्दल बोलायचे झाले, तर चार सामन्यांच्या या मालिकेतील पहिले दोन सामने गमावल्यानंतर ऑस्ट्रेलिया ०-२ ने पिछाडीवर आहे. पॅट कमिन्सचा संघ नागपुरात एक डाव आणि १३२ धावांनी पराभूत झाला होता, तर भारताने दिल्ली कसोटीत त्यांचा ६ गडी राखून पराभव केला होता. या सलग दोन पराभवांनंतर कसोटी क्रिकेटमधील नंबर १चा मुकुटही ऑस्ट्रेलियाकडून हिसकावण्यात आला आहे. मालिकेतील तिसरा सामना १ मार्चपासून इंदूरमध्ये खेळवला जाणार आहे.**

# भारतीय संघांसाठी नवी जर्सी!

## बीसीसीआयचा आदिदासशी करार

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

भारताने कसोटी मानांकनामध्ये अव्वल स्थानावर असलेल्या ऑस्ट्रेलियाला पहिल्या दोन कसोटीत अडीच दिवसात गुंडाळले. भारताने चार कसोटी सामन्यांच्या बॉर्डर - गावसकर ट्रॉफी मालिकेतील पहिले दोन कसोटी सामने जिंकले आहेत. त्यामुळे भारताचे विश्व कसोटी स्पर्धेत अंतिम स्थान जवळपास पक्के झाला आहे. ही अंतिम फेरी 7 जूनला ओव्हल येथे होणार आहे.

बीसीसीआयने या अंतिम सामन्याची आतापासूनच जय्यत तयारी करण्यास सुरूवात केली आहे. बीसीसीआय अदिदास सोबत मोठा करार करण्याच्या तयारीत आहे. जर सगळं काही व्यवस्थित झालं तर अदिदास ही भारतीय जूनपासून क्रिकेट संघाच्या जर्सीची प्रायोजक असणार आहे. . ही नवी जर्सी रोहित सेना विश्व कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पहिल्यांदा घालण्याची शक्यता आहे.

भारतीय संघची जर्सी प्रायोजक सध्या किलर जीन्स आहे. त्यांनी एमपीएलकडून हे प्रायजक पद घेतले होते. मात्र बीसीसीआय आता प्रसिद्ध प्रसिद्ध ब्रँडशी जोडली जाणार आहे. 2016 आणि 2020 मध्ये नायकी भारताच्या किटचे स्पॉन्सर होते. एमपीएलने भारतीय जर्सी प्रायोजकासाठी 2016 मध्ये बीसीसीआयशी 370 कोटी रूपयांचा करार केला होता. हा करार डिसेंबर 2023 पर्यंत होता. मात्र त्यापूर्वीच एमपीएलने करार कीलर जिन्सकडे हस्तांतरित केला. किलरने बांगलादेश दौऱ्यापासून भारतीय संघाचे जर्सी प्रायोजक आहे. किलरकडे कोणत्याही स्पोर्ट्स किट तयार करण्याचा अनुभव नाही. त्यामुळे बीसीसीआयच्या ब्रँड इमेजमध्ये किलर फिट बसत नाही. अनेक मोठे खेळाडूंना नायकी, अदिदास आणि प्यूमा स्पॉन्सर करतात. त्यामुळे बीसीसीआय देखील यापैकी एका ब्रँडसोबत करार करू इच्छिते.यापूर्वी अदिदास मुंबई इंडियन्स आणि इंग्लंड क्रिकेट संघाची जर्सी स्पॉन्सर राहिले आहे.